प्रति : नगरसचिव
प्रेषक : आयुक्त

<u>प्रस्तावना</u> :
गोषवारा

**विषय :- भिवंडी मनपातील पर्यावरण विभागामार्फत सुरु असलेल्या हवा सर्वेक्षण प्रकल्पास दिनांक ०१ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत हवा सर्वेक्षणाचे काम माहे मार्च २०११ पासून मा.महाससभेच्या मान्यतेने मंजुर अटी व शर्तीनुसार ठोक वेतनावर कर्मचा-यांची नियुक्ती करुन सुरु करण्यात आले. सदर प्रकल्पास वेळोवेळी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ घेण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत ४ हवा सर्वेक्षण केंद्राचे कामकाज सूरु असूनत्याकरीता संपूर्ण खर्च केंद्र शासनव्दारे प्राप्त होत आहे. **केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्ड, पर्यावरण, वन एवं जलवायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील पत्रक्र. ए-१८०११/६३/२००० (पार्ट२)/एम. ओ. एन.दि.११/०८/२०१६** मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पास, प्रकल्पातील ०१ पर्यावरण निरिक्षक तथा केमिस्ट व ०३ क्षेत्र सहाय्यक या ठोक वेतनावरील कर्मचाऱ्यांना मा.महासभा ठराव क्र.४६७ दि.०८/०२/२०२२ नूसार दि.३१/१२/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सदर केंद्रीय हवा सर्वेक्षण प्रकल्पास केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ,भारत सरकार यांच्या निर्देशानुसार सदर प्रकल्पास केंद्रीय हवा सर्वेक्षण प्रकल्पातंर्गत समाविष्ठ करण्यात आलेले आहे, त्याकरिता महानगरपालिकेस संपूर्ण अनुदान (निगा-दुरुस्ती व वेतन खर्च) केंद्र शासनाकडुन मिळत आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात डाईंग, सायझिंग तसेच इतर कारखाने असून प्रदुषण संबंधित अनेक प्रश्न उद्‌भवतात. त्याकरिता भिवंडी महानगरपालिकेमध्ये पर्यावरण विभाग कार्यान्वीत असून हवा सर्वेक्षणाचे कामकाज सुरु आहे. भिवंडी मनपातील पर्यावरण विभागात पर्यावरण संवर्धन व प्रदुषण संबधीत तक्रारी यांचे निवारण,भिवंडी शहराचा वार्षिक पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयारकरणे, माझी वसूधरा अभियान प्रभावीपणे राबविणे, जैवविविधता समितीने नेमून दिलेली कामे पार पाडणे, शासकिय व निमशासकिय यांचे पत्र व्यवहार,दैनंदिन मान्सुन अहवाल, तसेच जनहित याचिका,न्यायालयीन नोटिस व मा. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांचेकडील पर्यावरण विभागाशी संबंधित पत्र व्यवहार इ. कामकाज पर्यावरण विभागामार्फत करण्यात येतात. यामुळे या शहराचा आधुनिक आणि शाश्वत विकास करण्यासाठी पर्यावरण विभागास अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत सूरु असलेल्या केंद्रीय हवा प्रदूषण सर्वेक्षणाअंती सद्यस्थिती वातावरणात होणारे बदल व हवेची गुणवत्ता सुधारणेचे उदिष्ट निश्चित केलेले असल्याने भिवंडी शहरामध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नियमितपणे **Continuous Ambient Air Quality Monitoring Station** उभारणेत आलेले असुन, या प्रकल्पाकरीता संपूर्ण खर्च महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत होणार असल्याने भिवंडी शहरातील हवेची गूणवत्ता व वातावरणात होणारे बदल याबाबत नियमितपणे मोजमाप होणार असल्याने सदर प्रकल्प भिवंडी मनपास निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.

मा. अति. संचालक सो, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडील पत्र क्र. **MonitorinMPCB/JDAPC/SAMP-BHIWANDI/B-०१५१** दि.०६/०३/२०२१ अन्वये हवा सर्वेक्षण प्रकल्पाकरीता अतिरिक्त केंद्र स्व. संपदा नाईक हॉल, भादवड येथे मंजूर करण्यात आलेले असून त्याकरीता २ वर्षाकरीता सहयंत्र व कर्मचाऱ्यांचे वेतन, निगा व दूरूस्तीसह मनपास अनुदान देण्यात आलेले आहे.

तरी भिवंडी महानगरपालिका अंतर्गत सुरू असलेले केंद्रीय हवा सर्वेक्षण प्रकल्पातील ०१ पर्यावरण निरिक्षक तथा केमिस्ट व ३ क्षेत्र सहाय्यक या कर्मचा-यांस ठोक वेतनावर ०१ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ चा कालावधी करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. सद्यस्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती गठीत नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३५ - अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ २०२०/ प्र.क्र.७१ (भाग २) / नवि, दि. ०६/०६/२०२२ च्या अनुषंगाने मा. प्रशासक तथा आयुक्त यांचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमांक : १००**

**दिनांक : २८ / ०२ /२०२३**

भिवंडी मनपातील पर्यावरण विभागामार्फत सुरु असलेल्या हवा सर्वेक्षण प्रकल्पास दिनांक ०१ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत प्राप्त प्रशासनाच्या प्रस्तावानुसार भिवंडी महानगरपालिका अंतर्गत सुरु असलेले हवा सर्वेक्षण प्रकल्पास, प्रकल्पातील ०१ पर्यावरण निरीक्षक तथा केमिस्ट व ०३ क्षेत्र सहाय्यक या ठोक वेतनावरील कर्मचा-यांसह पुर्ननियुक्ती करणेस महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ २०२०/ प्र.क्र.७१ (भाग २) / नवि, दि. ०६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३५ - अ मधील तरतुदी अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी. मान्यता देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी.